कि.फौ.अ.क्र. ३३/२०२२
निशाणी क्र. ३४ च्या पुढे

**उलटतपास जाबदेणार यांचे वकील श्री. एच. डी. नरूटे यांचेमार्फत शपथेवर सुरू**

**१३.** आज शुक्रवार असून २० तारीख आहे. मी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र किती तारखेला दाखल केले हे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर माझ्या भावाने वकीलांना सांगितला होता. बारामती येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयात दाखल केलेल्या अर्जाचा नंबर मला सांगता येत नाही. सदर अर्ज अर्जदाराने नांदावयास यावे म्हणून मी दाखल केला होता. सदर अर्ज किती तारखेस दाखल केला हे मी सांगू शकत नाही. सदर अर्जामध्ये तडजोड झाली व तडजोडीनुसार अर्जदार माझ्याकडे नांदावयास आली. अर्जदार माझ्याकडे तडजोडीनुसार नांदावयास कधी आली हे मी सांगू शकत नाही. तडजोड झालेनंतर दुसऱ्या दिवशी अर्जदार माझ्याकडे मौजे पेडगाव, ता. दौंड, जि. पुणे येथे नांदावयास आली. अर्जदार क्र. २ व ३ अर्जदार क्र. १ सोबत राहतात. अर्जदार क्र. १ चे वडील व चुलते मयत आहेत किंवा कसे हे मला माहित नाही. अर्जदार बारामती येथील न्यायालयामध्ये झालेल्या तडजोडीनुसार माझ्याकडे नांदावयास आली त्यावेळी आम्ही दोघेच राहत होतो. मी व माझ्या भावामध्ये शेत जमिनीचे वाटप झाले आहे. माझे हिश्श्याला पावणेतीन एकर जमिन मिळाली आहे. माझ्या आईवडीलांच्या हिश्श्याला प्रत्येकी पावणेतीन एकर जमिन दिली आहे. माझ्या भावाला देखील पावाणेतीन एकर जमिन दिली आहे. माझा भाऊ काय करतो हे मी सांगू शकत नाही. माझा भाऊ नोकरी करतो. माझ्या भावाचे नाव दिलीप संभाजी विघ्ने असे असून तो पाटस येथे नोकरीस आहे. माझ्या भावाची पत्नी त्याच्यासोबत पाटस येथे राहणेस आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईवडील माझेसोबत राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाची शेती तसेच माझी व आईवडीलांची शेती यामधील सर्व कामे मी करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाऊ व आईवडील असे सर्वजण एकत्र राहतो व मी माझ्या भावाचे ऐकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा भाऊ आणि आईवडील असे सर्वांनी मिळून अर्जदार हिस गावामध्ये बेदम मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने मी व माझ्या कुटूंबियांविरूध्द मारहाण केली म्हणून दौंड पोलीस

ठाणे येथे तक्रार क्र. १२९७/२०२३ दिनांक १६/१२/२०२३ रोजी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ११/०५/२०२२ रोजी अर्जदार हिने मी व माझे कुटूंबियांविरूध्द गु.र.नं. २१६/२०२२ भारतीय दंड विधान कलम ४९८अ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता व त्यानुसार इंदापूर न्यायालयात तो खटला न्यायप्रविष्ठ आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माझ्याकडे नांदावयास आल्यानंतर मी व माझ्या कुटूंबियांतील व्यक्तीने तिला चार ते पाच वेळा मारहाण केली, तिचा मानसिक व शारिरीक छळ केला तसेच तिच्यावर संशय देखील घेतला. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/०४/२०२२ पासून अर्जदार तिच्या भावासोबत राहणेस आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. १ नोकरीस नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. १ हिच्या नावे माहेरी देखील शेती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत केस सुरू झाल्यानंतर देखील मी व माझ्या भावाने अर्जदार क्र. १ तारखेदिवशी न्यायालयातून इंदापूर एस. टी. बस स्टॅण्ड येथे गेली असता ती प्रसाधनगृहामध्ये जातेवेळी तिला बेदम मारहाण केले व त्याबाबत अर्जदार क्र. १ हिने इंदापूर पोलीस ठाणेत तक्रार दिली होती. अर्जदार क्र. १ हिने जंक्शन पोलीस ठाणे येथे मी व माझे भावाविरूध्द एन.सी.आर. दाखल केला होता व पोलीसांनी आम्हाला चौकशीसाठी बोलाविले होते.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६/०४/२०२२ नंतर अर्जदार क्र. १ हिने नांदावयास यावे यासाठी मी नोटीस पाठविली नाही त्याचप्रमाणे न्यायालयात अर्ज देखील दाखल केला नाही. अर्जदार क्र. २ व ३ हे इयत्ता ७ वी व ८ वी मध्ये शिकत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मागील तीन वर्षापासून अर्जदार क्र. २ व ३ यांच्या राहण्याचा, शिक्षणाचा व औषधोपचाराचा संपूर्ण खर्च अर्जदार क्र. १ करते. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. २ व ३ यांचा खर्च मी करत नाही. अर्जदार क्र. २ व ३ कोणत्या शाळेत शिक्षण घेतात हे मी सांगू शकत नाही. अर्जदार क्र. २ व ३ यांची भेट घेणेसाठी मी न्यायालयामध्ये अर्ज केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिने माझेसोबत नांदावे यासाठी मी वैयक्तिकरित्या प्रयत्न केला नाही. मी दोन वेळा अर्जदार हिचेकडे तिला

**कि.फौ.अ.क्र. ३३/२०२२**
**निशाणी क्र. ३४ च्या पुढे**

नांदावयास घेउन येणेसाठी गेलो होतो. प्रस्तुत केस दाखल करणे अगोदर दोन वेळा मी अर्जदार हिला नांदावयास घेउन येणेसाठी गेलो होतो. माझ्या व अर्जदाराच्या भांडणाबद्दल मी गावातील पोलीस पाटील व तंटामुक्त अधिकारी यांना कल्पना दिली नाही. वालचंदनगर पोलीस ठाणे यांना अर्जदार नांदावयास येत नाही म्हणून लेखी कळविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्जदार हिला नांदावयास घेउन येणेसाठी गेलो नसल्याने त्याबाबत पोलीस पाटील व तंटामुक्त अधिकारी यांना कल्पना दिली नाही तसेच वालचंदनगर पोलीस ठाणेस कळविले नाही.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, मला शेती व्यवसायातून दरवर्षी १० ते ११ लाख रूपये व दुग्ध व्यवसायातून ५० ते ६० हजार प्रतिमहिना उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे आहे की, मौजे पेडगाव, ता. दौंड, जि. पुणे येथे मी, माझा भाऊ व आईवडील यांचे नावे गट क्र. २४८/२ मध्ये जमिन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या सांगणेवरून मी अर्जदार क्र. १ चा छळ करतो व तिला नांदवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार माझेसोबत नांदणेस आल्यानंतर माझ्या भावाचे काम बंद पडेल म्हणून तो मला अर्जदारास नांदवू देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारांना प्रतिमहिना रक्कम रूपये १०,०००/— पोटगी देणेची माझी ऐपत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कौटूंबिक हिंसाचार केला म्हणून अर्जदारास तिच्या मागणीप्रमाणे नुकसान भरपाई देणेची माझी ऐपत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत अर्जास खोटे म्हणणे दाखल करून सरतपासाचे खोटे प्रतिज्ञापत्र मी दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/—
(एस. बी. लेंडवे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक २०/०६/२०२५